# ही गोष्ट हो एका प्रेसीडंटची..

(चाल- अजी मै झूठ बोलीया कोयीना)

न्यायमूर्ती एडीथ स्टारकर--

ही गोष्ट हो एका प्रेसीडंटची..आणि त्याच्या ईन्टर्नची
ही गोष्ट हो बिली प्लेयबॉयची आणि त्याच्या लोलीटेची
कान ठेवूनी उघडे ऐका, गोष्ट ही बिनमोलाची
ठाऊक झाली थोरा-पोरा, लाज गेली ओव्हलची





कोणी त्या व्हेलरीबाईला बोलवा,
कोणी त्या लोलीटेला दूर पळवा,
कोणी त्या बिलीबॉयला आवरा
हो आवरा, हो आवरा, हो आवरा
अरे बिली, बिली, बिली, बिली, बिली
अशी खालीपिली, लफडी करू नको
घेऊन मूलीबाळी , मजा करू नको
ऊहूहू, ऊहूहू, ऊहूहू, ऊहूहू......

एक, दोन अन् तीन चार अशा, पोरी किती तरी झाल्या
ओव्हलच्या त्या स्टडीमध्ये, चावट गोष्टी घडल्या
ऑडीयो व्हिडिओ त्यांच्या टेपा, आमच्या हाती आल्या
डेमॉक्रटसच्या फुल्या फुल्या, कपाळात मग गेल्या
कोणी त्या व्हेलरीबाईला बोलवा,
कोणी त्या लोलीटेला दूर पळवा,
कोणी त्या बिलीबॉयला आवरा
हो आवरा, हो आवरा, हो आवरा
अरे बिली, बिली, बिली...

सुहास पै.